जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/१२/२०२३
## दि.०६/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १२३४/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हे.ॲक्ट १८४,१३२(अ)(ब), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | राजेंद्र खामकर,पोलीस हवालदार,कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | भरत गोपाळ चंदेवाड,वय-५०,रा.संभाजीनगर,कोंढवा सासवड रोड,कोढवा-बुद्रुक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/१२/२०२३ रोजी १५/२० वा.महालक्ष्मी वॉशिंग सेंटरचे बाजुला रोडचे कडेला टिळेकर नगर कोढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक अनोळखी इसम,वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे हा झोपलेला असताना,त्याचे अंगावरून डंपरचे पाठीमागील चाक घालुन,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कुदळे ८३०८६६६१९८२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५६१/२०२३,भादविक ३२४,५०४,५०६,४२७,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | अमोल ढोबळे,वय-३१ वर्षे,रा.खांदवेनगर,लोहगांव,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/१२/२०२३ रोजी दुपारी १२/३० ते ०१/०० वा.चे दरम्यान जुना मुंढवा रोड,चंदननगर पुणे येथील कंपनीचे ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे जुना मुंढवा रोड,चंदननगर,पुणे येथील इंन्स्टा गो.प्रा.लिमी.कंपनी मधील कामगार यातील नमुद इसम याचेविरुध्द क्लाईन्टच्या तक्रारी येत असल्याने फिर्यादी यांनी त्यास वेळोवळी समजावून सांगुन सुध्दा त्याचे कामामध्ये सुधारणा झाली नाही. त्यानंतर दि. ०१/१२/२०२३ रोजी पुन्हा समजावुन सांगण्यासाठी फिर्यादी यांनी त्यास कॉल केला असता त्याने उचलला नाही म्हणून फिर्यादी यांनी त्यास ग्रुप मधून काढुन टाकल्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांचे ऑफीस मध्ये येऊन,तु मला ग्रुप मधून का काढले असे म्हणून तु बाहेर ये तुझ्याकडे बघुन घेतो अशी धमकी देऊन निघुन जावुन,पुन्हा ऑफीस मध्ये येऊन फिर्यादी यांना शिवीगाळ करून,त्याचे हातातील बांबुने फिर्यादी यांचे उजवे हातावर मारून,त्यांचा आय फोन फोडून तसेच ऑफीस मधील काचा फोडून नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, बुधवंत ९१३०४४१९१९३७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**